सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ३७ ] गुरुवार, जानेवारी ७, २०१०/पौष १७, शके १९३१ [ पृष्ठे २, किंमत रुपये २६.००

**असाधारण क्रमांक १**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.**— डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | **पृष्ठे** १-२ |

दिनांक ६ जानेवारी २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** "
दिनांक ७ जानेवारी २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३१ ऑगस्ट २००९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २००९, प्रख्यापित केला होता ;

१९८९ चा महा. २२.
१९९४ चा महा. ३५.
२००९ चा महा. अध्या २२.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २००९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३१ ऑगस्ट २००९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**२.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ याच्या कलम १२ मधील, पोट-कलम (७) मध्ये, " सहा महिन्यांचा कालावधी संपेपर्यंतची मुदत " या मजकुराऐवजी " बारा महिन्यांचा कालावधी संपेपर्यंतची मुदत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९८९ चा महा. २२.

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ याच्या कलम १२ मधील, पोट-कलम (७) मध्ये, " सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीकरिता " या मजकुराऐवजी " बारा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीकरिता " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९९४ चा महा. ३५.

सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २२ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २००९, हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००९ चा महा. अध्या. २२.

(२) असे निरसन झाले असले तरी उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यांन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, संबद्ध अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये, यथास्थिति, करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल. १९८९ चा महा. २२. १९९४ चा महा. ३५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक ५५] गुरुवार, जानेवारी ७, २०१०/पौष १७, शके १९३१ [ पृष्ठे २, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक १


## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Dr. Babasaheb Ambedkar Technological University and the Maharashtra Universities (Amendment) Act, 2009 (Mah. Act No. I of 2010) is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. I OF 2010.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 7th January 2010).*

An Act further to amend the Dr. Babasaheb Ambedkar Technological University Act, 1989 and the Maharashtra Universities Act, 1994.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amendthe Dr. Babasaheb Ambedkar Technological University Act, 1989 Mah. XXII of 1989.

and the Maharashtra Universities Act, 1994, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Dr. Babasaheb Ambedkar Technological University and the Maharashtra Universities (Amendment) Ordinance, 2009 on the 31st August 2009 ; Mah. XXXV of 1994. Mah. Ord. XXII of 2009.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixtieth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Dr. Babasaheb Ambedkar Technological University and the Maharashtra Universities (Amendment) Act, 2009.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 31st August 2009.

Amendment of section 12 of Mah. XXII of 1989.

2. In section 12 of the Dr. Babasaheb Ambedkar Technological University Act, 1989, in sub-section (*7*), for the words "until a period of six months" the words "until a period of twelve months" shall be substituted. Mah. XXII of 1989.

Amendment of section 12 of Mah. XXXV of 1994.

3. In section 12 of the Maharashtra Universities Act, 1994, in sub-section (*7*), for the words "a term not exceeding six months" the words "a term not exceeding twelve months" shall be substituted. Mah. XXXV of 1994.

Repeal of Mah. Ord. XXII of 2009 and saving.

4. (*1*) The Dr. Babasaheb Ambedkar Technological University and the Maharashtra Universities (Amendment) Ordinance, 2009 is hereby repealed. Mah. Ord. XXII of 2009.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the Dr. Babasaheb Ambedkar Technological University Act, 1989, or, as the case may be, the Maharashtra Universities Act, 1994, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the relevant Act, as amended by this Act. Mah. XXII of 1989. Mah. XXXV of 1994.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOpVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.